# जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

संपादक
डॉ. अशोक ढवळे
कार्यकारी संपादक
विजय पाटील
संपादक मंडळ
अजित अभ्यंकर
डॉ. विठ्ठल मोरे
डॉ. उदय नारकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
हिरा जनार्दन
प्राची हातिवलेकर
मुद्रक/प्रकाशक
डॉ. अशोक ढवळे
अक्षरजुळणी
आत्माराम पडवळ
मुखपृष्ठ व मांडणी
केतन शिंदे
व्यवस्थापक
चंद्रकांत शिंदे
प्रसिद्धी स्थळ
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com


## १९१७ : क्रांतिकारी सोव्हिएत सरकारचे पहिले तीन आदेश

# १. शांतता प्रस्थापित करा!

*झारशाहीच्या सत्तेखालील रशियाने पहिल्या महायुद्धात सहभागी होण्यास लेनिनच्या नेतृत्वाखाली बोल्शेव्हिकांनी विरोध केला होता. लेनिनने त्या युद्धाचे वर्णन साम्राज्यवादी युद्ध असे केले होते. युरोपातील साम्राज्यशाह्यांनी कामगारांना सैन्यात सक्तीने भरती करून घेतले होते आणि युद्धात लाखो कामगार सैनिक म्हणून ठार झाले होते. युरोपातील कित्येक देशांतील लोकशाही समाजवाद्यांचा युद्धाला विरोध नव्हता. त्यांच्याहून सर्वस्वी वेगळी भूमिका घेत बोल्शेव्हिकांनी युद्धाला विरोध करून देशादेशांतील संघर्ष ताबडतोब थांबवले पाहिजेत, अशी भूमिका घेतली. शांतता, भाकरी आणि जमीन या घोषणा देत रशियातील कामगार, शेतकरी आणि सैनिक ऑक्टोबर क्रांतीत उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. नव्या क्रांतिकारी सरकारचा पहिला आदेश होता 'शांतता' प्रस्थापित करण्याचा. हा आदेश स्वत: लेनिनने शब्दांकित केला होता. त्याचा मराठी अनुवाद आम्ही खाली देत आहोत.*

युद्धात उतरलेली जनता आणि त्यांच्या सरकारांनी न्याय्य, लोकशाहीवादी शांतता प्रस्थापित करण्यासाठी विनाविलंब बोलणी सुरू करावीत असे आवाहन कामगार, सैनिक आणि शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींच्या सोव्हिएत्सच्या आधारे २४-२५ ऑक्टोबरच्या क्रांतीतून बनलेले सरकार करत आहे.

युद्धात सहभागी झालेले देशातील बहुसंख्य कामगार आणि कष्टकरी जनता थकून, भागून गेली आहे, युद्धाने पिचून गेली आहे. त्यामुळे ती लोकशाहीवादी न्याय्य शांततेची भुकेली आहे. झारची जुलमी राजवट उलथून दिल्यादिवसापासून रशियन कामगार आणि शेतकरी चिरस्थायी शांततेची ठाम मागणी करत आहेत. सरकारच्या मते शांतता म्हणजे कोणताही परकीय प्रदेश ताब्यात न घेता, आपल्या देशाला न जोडता, कसलीही नुकसान भरपाई न देता त्वरित युद्धविराम करणे.

युद्धात उतरलेल्या सर्व देशांनी असा तह ताबडतोब करावा, अशी मागणी रशियन सरकार करत आहे. सर्व देशांच्या प्रतिनिधीगृहांनी शांतता करारांना मान्यता देण्याची वाट न पाहता आमचे सरकार सर्व ती आवश्यक पावले ठामपणे उचलण्यास तयार आहे.



लोकशाही प्रथा आणि विशेषत: कामगारवर्गीय मूल्यांनुसार एखाद्या देशाच्या मान्यतेशिवाय त्याला आपल्या देशात सामील करून घेणे, त्याचा प्रदेश आपल्या देशाला जोडून घेणे मान्य नाही. एखाद्या कमजोर देशाने स्वेच्छेने मान्यता न देता दुसऱ्या शक्तिशाली देशाने त्याला आपल्यात सामावणेही मान्य नाही. असे बळजबरीचे सामिलीकरण कधीही झालेले असले तरी ते अमान्यच राहील. अशा बळजबरीने सामील केलेल्या देशाचा मागासलेपणा हे सामिलीकरणाचे समर्थनीय कारण होऊ शकत नाही. शेवटी, तो देश युरोपात आहे की युरोपच्या बाहेर हेदेखील सामिलीकरणाच्या दृष्टीने अनावश्यक कारण आहे.

एखाद्या देशाने दुसरा देश जबरदस्तीने आणि बळाच्या जोरावर आपल्या सीमांच्या अंकित ठेवला, त्या अंकित देशाने कोणत्याही मार्गाने - वृत्तपत्रांतून, जाहीर सभांतून, राजकीय पक्षांच्या निर्णयांतून अथवा राष्ट्रीय दडपशाहीविरुद्ध केलेल्या उठावातून - आपली स्वयंनिर्णयाची इच्छा व्यक्त केली आणि आक्रमक देशाने त्यानुसार त्या प्रदेशातून सैन्य मागे घेऊन जनतेवर काडीचाही दबाव न आणता मुक्त मतदानाने त्यांना निवडीची संधी न दिल्यास, ती कृती हिंसक आणि आक्रमकच मानली जाईल.

आजवर जिंकलेले दुर्बल देश आपसात कसे वाटून घ्यायचे हे बलवान आणि श्रीमंत देशांनी ठरवण्यासाठी जगावर युद्ध लादणे हा मानवतेविरुद्ध जबर गुन्हा आहे; म्हणून सरकार अतिशय गांभीर्याने पण निर्धाराने हे युद्ध थांबवण्यासाठी उपरोल्लेखित अटींवर शांतता करारावर त्वरित सही करण्यास बांधील आहे. या अटी सर्व राष्ट्रांसाठी निरपवादपणे न्याय्य आहेत.

त्याचबरोबर वरील शांतता अटी म्हणजे काही अंतिम इशारा आहे, असे सरकार मानत नाही. दुसऱ्या शब्दांत बोलायचे तर हे सरकार शांततेसाठी दुसऱ्या कुठल्याही अटींचा विचार करायला तयार आहे. फक्त युद्धातील कोणत्याही देशाने स्वत: लवकरात लवकर असा शांतता प्रस्ताव ठेवायला हवा. त्या प्रस्तावात कसल्याही अस्पष्टतेला वा संदिग्धतेला वाव न ठेवता तो अत्यंत स्पष्ट, स्वच्छ आणि गुप्ततेपासून मुक्त असला पाहिजे.

सरकार परराष्ट्र नीतीतील गुप्तता नष्ट करत असून स्वत:चे परराष्ट्रांसोबतचे राजनैतिक व्यवहार पारदर्शक ठेवण्यासाठी त्याविषयीच्या सर्व चर्चा सर्व लोकांसमक्ष करू इच्छिते. फेब्रुवारी ते २५ ऑक्टोबर १९१७च्या दरम्यान जमीनदार आणि भांडवलदारांच्या सरकारने केलेले सर्व गुप्त करार संपूर्णतया उघडे करण्यास सुरुवात करील. या करारात रशियन जमीनदार आणि भांडवलदार यांना देण्यात आलेल्या सर्व सवलती आणि फायदे आणि बड्या रशियन साम्राज्यातील देश व प्रदेशांचे सामिलीकरण रद्दबातल ठरवीत आहे.

खुली शांतता प्रस्थापित करण्यासाठी त्वरित चर्चा सुरू करावी असा प्रस्ताव विविध देशांच्या सरकारांसमोर आम्ही ठेवत आहोत. आम्ही स्वत: ही चर्चा लेखी स्वरूपात, तारायंत्राच्या माध्यमातून वा देशांच्या प्रत्यक्ष प्रतिनिधींच्या माध्यमातून करण्यास पुढाकार घेऊ. प्रतिनिधींची परिषद ठरल्यास त्यातही सहभागी होऊ. या चर्चा आणि हा विचारविनिमय फलदायी होण्यासाठी आमचे सरकार तटस्थ देशांत आपले पूर्ण दर्जा असलेले प्रतिनिधी नेमत आहे.

युद्धात सहभागी असलेल्या सर्व देशांची सरकारे आणि त्या देशांतील जनता यांच्यासमोर तातडीची युद्धबंदी जाहीर करत आहे. ही युद्धबंदी किमान तीन महिने असावी, असा आमचा प्रस्ताव आहे. चर्चा करण्यात देशांची स्पर्धा लागावी, तहात सहभागी होण्यात एकाही देशाचा अपवाद राहू नये, जे देश जबरदस्तीने युद्धात ओढण्यात आले आहेत त्यांना त्यातून बाहेर पडता यावे, आणि शांतता तहाचा अंतिम मसुदा मंजूर करण्यासाठी प्रत्येक देशातील जनतेच्या प्रतिनिधीगृहांच्या बैठका बोलवता याव्यात यासाठी हा तीन महिन्यांचा कालावधी पुरेसा आहे.

युद्धात सहभागी झालेल्या सर्वच देशांतील जनतेला आणि सरकारांना शांतता प्रस्थापित करण्याचे आवाहन करत असताना रशियातील कामगार शेतकऱ्यांचे हंगामी सरकार ग्रेट ब्रिटन, फ्रान्स आणि जर्मनी या मानवाच्या इतिहासातील तीन सर्वात विकसित देशांतील वर्गीय जाणीव जागृत झालेल्या कामगारवर्गास विशेष आवाहन करत आहे. प्रगती आणि समाजवादाच्या उद्दिष्टांसाठी या तीन देशांतील कामगारांनी मोठे योगदान दिले आहे. इंग्लंडमधील चार्टिस्ट आंदोलन, फ्रेंच सर्वहारावर्गाने छेडलेल्या कित्येक महत्त्वपूर्ण क्रांत्या, आणि जर्मनीतील समाजवादविरोधी कायद्याविरुद्धचा वैभवशाली लढा यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. हे लढे म्हणजे सर्व जगासमोरचे आदर्श होत. या तीनही देशांतील लढाऊ कामगारवर्गाने आपल्या त्यागाच्या आणि ऐतिहासिक सृजनाच्या उदाहरणांमधून दाखवून दिले आहे की युद्धाच्या भयानक संहारातून मानवतेला वाचवण्याची क्षमता त्यांच्यात निश्चितच आहे. ते आपल्या जोमदार आणि चैतन्यपूर्ण कृतीद्वारा शांतता प्रस्थापित करण्यात कळीची भूमिका निभावतील, एवढेच नव्हे तर सर्व प्रकारच्या गुलामीतून आणि शोषणातून शोषित, श्रमिक जनतेला मुक्त करण्याच्या आमच्या कामात सहभागी होतील, असा विश्वास आम्हाला वाटतो.

# २. जमिनीविषयीचा आदेश

***(शांततेच्या आदेशानंतर लेनिनच्या नेतृत्वाखालील सोव्हिएत सरकारने लगेच दुसरा आदेश काढला तो जमिनीविषयीचा. ८ नोव्हेंबर १९१७ रोजी पारित झालेल्या या आदेशाने जमिनीच्या फेरवाटपाचा निर्णय घेतला. लेनिनचा आग्रह होता की, कामगार-शेतकरी एकजुटीच्या सरकारचे पहिले कर्तव्य जमिनीचा प्रश्न सोडविण्याचे असले पाहिजे आणि शेतकऱ्यांना जमिनी दिल्या पाहिजेत. त्यानुसार जमिनीविषयीच्या आदेशाने जमिनीवरील खाजगी मालकी बरखास्त केली. त्या सरंजामशाही व्यवस्थेत राजा, मठ, चर्च व इतर जमीनदारांच्या जमिनी जप्त करण्यात आल्या आणि त्यांचे शेतकरी-शेतमजुरांमध्ये मोफत वाटप करण्यात आले. हा ऐतिहासिक जमिनीविषयीचा आदेश देत आहोत.)***

१. कुठल्याही नुकसान भरपाईशिवाय जमिनीवरील मालकी ताबडतोब नष्ट करण्यात येत आहे.

२. इस्टेटी, राजा, मठ आणि चर्च यांच्या जमिनी, त्यांची गुरे जनावरे, अवजारे, इमारती आणि संबंधित सर्व बाबी घटना समिती निर्माण होईपर्यंत

परगणा समित्या आणि शेतकरी समित्यांच्या ताब्यात राहतील.

३. जप्त केलेली सर्व मालमत्ता येथून पुढे सर्व जनतेच्या मालकीची होईल. या मालमत्तेला हानी पोहोचवणे हा गंभीर गुन्हा मानला जाऊन क्रांतिकारक न्यायालये त्यावर निवाडा करून शिक्षा देऊ शकतील. इस्टेटी जप्त केल्या जात असताना कायदा आणि सुव्यवस्था कठोरपणे राबवण्याची जबाबदारी शेतकरी समित्यांवर राहील, त्यासाठी त्या योग्य ती पावले उचलतील. त्या इस्टेटींचे आकारमान ठरवणे, इस्टेटीसोबत तिच्यातील जप्त केलेल्या वस्तुंची मोजदाद करून त्यांच्या याद्या बनवणे आणि जनतेकडे हस्तांतरीत केलेले शेती उद्योगांचे, त्यांच्यातील इमारती, अवजारे, जनावरे, उत्पादनाचे साठे इत्यादींचे अत्यंत क्रांतिकारी रीतीने कठोर संरक्षण करणे हे काम या समित्या करतील.

४. घटना समिती जमीन सुधारणांविषयीचा अंतिम निर्णय घेईपर्यंत 'इझवेस्तिया' या वर्तमानपत्रात संकलित करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या याद्या ग्राह्य धरण्यात येतील. त्या वर्तमानपत्राच्या अंक ८८ मध्ये अशा २४२ याद्या प्रसिद्ध झाल्या आहेत. घटना समिती अंतिम निर्णय घेईपर्यंत या याद्यांचीच अंमलबजावणी केली जाईल.

## जमिनीवरील शेतकऱ्यांचा हक्क

जमिनीचा प्रश्न सर्वांगाने केवळ लोकनियुक्त घटना समितीच अमलात आणू शकते. जमिनीचा प्रश्न खाली दिल्याप्रमाणे न्याय्य रीतीने सोडवावा लागेल :

१. जमिनीवरील खासगी मालकी कायमची नष्ट करण्यात येईल. जमिनीची खरेदी विक्री करता येणार नाही; ती गहाणवट ठेवता येणार नाही किंवा ती कोणत्याही रीतीने हस्तांतरीत करता येणार नाही.

सर्व जमीन - मग ती शासनाची असो वा राजाची, मठाची, चर्चची, कारखान्याची, ट्रस्टची, खासगी, सार्वजनिक वा शेतकऱ्याच्या मालकीची असो - ती विनामोबदला जप्त करण्यात येऊन ती सर्व जनतेच्या मालकीची होऊन, कसेल त्यांच्या हाती दिली जाईल.

मालमत्तेतील या क्रांतीचा फटका बसलेल्यांना नवीन जीवनाची सवय होईल अशा आवश्यक काळापुरतीच सामाजिक सुरक्षा दिली जाईल.

२. तेल, कोळसा, मीठ आदी सर्व खनिज संपत्ती तसेच, शासनाच्या दृष्टीने महत्त्वाची वन आणि जलसंपत्ती ही पूर्णत: शासनाच्या मालकीची राहील. सर्व छोटे ओहळ, तलाव, जंगले इत्यादी कम्यून्सकडे वर्ग केली जातील. त्यांचे व्यवस्थापन स्थानिक स्वराज्य संस्था करतील.

३. अत्यंत विकसित शास्त्रीय शेती केली जाते अशी जमीन - फळबागा, सीड प्लॉट्स, नर्सरीज, पॉलीहाऊसेस इ. - यांची विभागणी न करता त्यांचे रूपांतर आदर्श फार्ममध्ये केले जाईल. ती पूर्णत: शासनाकडे सोपवली जातील किंवा आकारमान पाहून कम्यूनच्या हवाली केली जातील.

खेड्यांतील आणि शहरांतील परस बागा, त्यावरील फळबागा आणि भाजीपाल्यांचे प्लॉट्स सध्याच्या मालकांच्या वापरासाठीच राखीव ठेवली जातील. त्याचे आकारमान किती असावे, त्यावरील कराचा दर काय असावा हे शासन ठरवील.

४. घोड्यांचे फार्म्स, विशेष जनावरांची पैदास करणारी फार्म्स, पोल्ट्री फार्म्स जप्त करण्यात येऊन सर्व जनतेच्या मालकीची होतील. ती शासन किंवा त्या त्या फार्मचे आकारमान व महत्त्व ध्यानात घेऊन कम्यूनच्या मालकीची होतील. घटना समिती नुकसान भरपाईच्या प्रश्नाचा विचार करील.

५. जप्त करण्यात आलेल्या इस्टेटीवरील सर्व जनावरे आणि अवजारे शासनाकडे वा आकारमान व महत्त्व ध्यानात घेऊन कम्यूनकडे हस्तांतरीत केले जातील. यासाठी कसलीही नुकसान भरपाई दिली जाणार नाही. अत्यल्प जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांची अवजारे जप्त केली जाणार नाहीत.

६. रशियन शासनसंस्थेच्या जमीन स्वत:च्या श्रमाने कसण्याची इच्छा असणाऱ्या सर्व नागरिकांना (लिंगनिरपेक्षरित्या) जमीन वापरण्याचा अधिकार राहील. ते स्वत:च्या कुटुंबाच्या श्रमाने वा कुणाच्या भागीदारीत कसू शकतील. परंतु ती कसण्याची क्षमता त्यांच्यात असावी.मजूर ठेवायला परवानगी नाही.

ग्रामीण कम्यूनमधील एखाद्या सदस्यास दोन वर्षाच्या कालावधीसाठी तात्पुरते शारीरिक अपंगत्व आल्यास त्या कम्यूनला तो शेतकरी पुन्हा काम करू लागेपर्यंत त्याची शेती सामुदायिकरित्या कसावी लागेल.

वयोवृद्ध झाल्यास वा आजारपणामुळे कायमचे विकलांग झाल्यास त्या शेतकऱ्याला ती शेती वापरण्याचा अधिकार राहणार नाही. मात्र, त्याला शासनाकडून पेन्शन मिळत राहील.

७. समतेच्या निकषावर जमिनीचा ताबा दिला जाईल. म्हणजे स्थानिक परिस्थितीनुसार किमान श्रम वा किमान गरजेच्या मानकानुसार जमीन वितरीत केली जाईल.

जमीन ताब्याच्या स्वरूपाबाबत कसलीही बंधने असणार नाहीत - प्रत्येक खेडे घराभोवतीची जागा, फार्म, सार्वजनिक मालकीची जमीन, सहकारी जमीन असे स्वत:चे निर्णय घेऊ शकते.

८. जमीन अधिग्रहित झाल्यास ती राष्ट्रीय भूमी निधीत जमा होईल. शेतकऱ्यांना त्यांचे वितरण करण्याचा अधिकार लोकशाही पद्धतीने निवडून दिलेल्या कम्यूनच्या, स्थानिक आणि केंद्रीय स्वराज्य संस्थांच्या हाती राहील. या संस्थात कसल्याही प्रकारचा सामाजिक भेदभाव असणार नाही.

लोकसंख्येतील वाढ, शेतीची उत्पादकता आणि शेतीतंत्राचा विकास यांच्या आधारावर भूमी निधीतून जमिनीचे नियमित वाटप केले जाईल. देण्यात आलेल्या जमिनींचे सीमाबदल होत असल्यास जमिनीच्या मूळ गाभ्याला हात लावता येणार नाही.

कम्यून सोडून जाणाऱ्या सदस्याची जमीन भूमी निधीत वर्ग केली जाईल. त्या जमिनीचा हक्क प्राधान्याने त्या सदस्याच्या जवळच्या नातेवाईकाला वा त्या सदस्याने मनोनित केलेल्या व्यक्तीला दिला जाईल.

जमीन भूमी निधीला परत करत असेपर्यंत खते आणि इतर जमीन सुधारणांवर केलेल्या खर्चाची भरपाई दिली जाईल.

एखाद्या जिल्ह्यातील भूमी निधी तेथील लोकसंख्येच्या गरजा भागवण्यास अपुरी असल्यास अतिरिक्त लोकसंख्येचे इतरत्र पुनर्वसन केले जाईल.

पुनर्वसनाचा खर्च, अवजारांचा खर्च आणि इतर सर्व जबाबदारी शासन घेईल. पुनर्वसन खालील क्रमाने करण्यात येईल : पुनर्वसित होऊ इच्छिणारे भूमिहीन शेतकरी, कम्यूनचे कामचुकार सदस्य आणि शेवटी चिठ्ठ्या टाकून वा स्वेच्छेने मान्यता देणारे.

या आदेशाचा संपूर्ण आशय रशियातील वर्गजाणीव जागृत झालेल्या बहुसंख्य शेतकऱ्यांच्या इच्छेचे प्रतिनिधित्व करतो. म्हणून तो हंगामी कायदा आहे. घटना समिती बसत नाही तोपर्यंत त्याचा शक्य तितक्या त्वरेने अंमल होईल. त्यातील काही तरतुदी शेतकऱ्यांच्या समित्या ठरवतील त्यानुसार हळूहळू लागू होतील.

९. सर्वसामान्य शेतकरी आणि सैनिकांच्या मालकीची जमीन जप्त केली जाणार नाही.

# ३. कामगारांच्या नियंत्रणाविषयीचे नियम

*(क्रांतीनंतर लगेचच 'कामगारांच्या नियंत्रणाचा कायदा' बनवण्यात आला. लेनिनने ८ आणि ९ नोव्हेंबर १९१७ रोजी लिहिलेला कामगारांच्या नियंत्रणाचा मसुदा पेट्रोग्राड फॅक्टरी कमिटीच्या केंद्रीय कौन्सिलमध्ये चर्चेअंती स्वीकारण्यात आला. त्या बैठकीला स्वत: लेनिन उपस्थित होता. २७ ऑक्टोबर रोजी मसुदा जनतेच्या कोमिसारच्या कौन्सिलसमोर ठेवण्यात आला. त्या कौन्सिलने मिल्युतिन आणि लारीन यांच्यावर दोन दिवसांत कामगारांच्या नियंत्रणाचे नियम कसे असावेत यांचा एक मसुदा बनवण्याची जबाबदारी टाकली. पण त्यांनी बनवलेला मसुदा आणि लेनिनने बनवलेली क्रांतिकारक कामगारांच्या नियंत्रणाविषयीची कार्ये यात अंतर्विरोध दिसून येऊ लागला. उदाहरणार्थ, कामगारांच्या नियंत्रण मंडळाचे निर्णय मालकांवर बंधनकारक राहतील, हे महत्त्वाचे कलमच या मसुद्यात नव्हते. त्यानंतर लेनिनचा मसुदा कामगारांच्या नियंत्रणाच्या कायद्याला आधार म्हणून ग्राह्य म्हणून स्वीकारण्यात आला. त्यात काही दुरुस्त्या करून तो '(श्रम आयोगाला सादर करण्यात आलेला) कामगारांच्या नियंत्रणाच्या कायद्याचा मसुदा' या मथळ्याखाली प्रसिद्ध करण्यात आला. यावर झालेल्या चर्चेत वेगवेगळ्या विभागांत स्थापन झालेल्या कामगार मंडळांच्या जागी सरकारी मंडळे स्थापन करावीत आणि कामगारांचे नियंत्रण फक्त रेल्वेसारख्या मोठ्या उद्योगांपुरते मर्यादित असावे असा प्रस्ताव आला. मात्र, कामगारांच्या पुढाकाराला प्रेरणा मिळण्यासाठी कामगारांचे नियंत्रण सर्वत्रच असावे, हा लेनिनचा आग्रह स्वीकारण्यात आला. या आदेशाचा अंतिम मसुदा तयार करण्याची जबाबदारी ८ नोव्हेंबरला स्थापन करण्यात आलेल्या अखिल रशिया केंद्रीय कार्यकारिणीच्या एका कमिशनला देण्यात आली. या कमिटीने १४ नोव्हेंबरला कमिशनने सादर केलेला मसुदा तपासून 'कामगारांच्या नियंत्रणाविषयीच्या नियमांचा मसुदा' या नावाने ओळखला जाणारा आदेश जारी केला. त्यात लेनिनचा मूळ प्रस्ताव समाविष्ट करण्यात आलेला आहे. हा आदेश 'इझवेस्तिया'मध्ये १६ नोव्हेंबर रोजी प्रकाशित करण्यात आला. तो आम्ही खाली देत आहोत.)*

१. कारखाना, व्यापार, बँका, शेती आणि इतर कोणत्याही उद्योगात पाचहून कमी कामगार आणि कार्यालयीन कर्मचारी नसल्यास आणि वार्षिक उलाढाल १० हजार रूबल्सहून कमी नसल्यास त्या ठिकाणच्या सर्व उत्पादनांची आणि कच्च्या मालाची साठवण, खरेदी आणि विक्री यावर कामगारांचे नियंत्रण असेल.

२. कामगारांचे नियंत्रण उद्योग लहान असल्यास थेटपणे सर्व कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या वा त्यांच्या निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या मार्फत ठेवले जाईल. ही निवडणूक सर्वसाधारण सभेत होईल आणि तिचे इतिवृत्त ठेवून निर्वाचित सदस्यांची नावे सरकार आणि कामगार, शेतकरी व सैनिकांच्या समितीला (सोव्हिएतला) कळवली जातील.

३. कामगार आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या परवानगीशिवाय एखाद्या शासकीयदृष्ट्या महत्त्वाच्या उद्योगातील काम स्थगित वा त्यात बदल करता येणार नाही.

४. निवडून दिलेल्या सर्व प्रतिनिधींना सर्व प्रकारच्या वह्या आणि दस्तावेज तसेच साहित्याचा, यंत्रसामग्रीचा आणि उत्पादनाचा साठा तपासण्याचा निरपवाद अधिकार राहील.

५. कामगार आणि कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींचे निर्णय एखाद्या व्यवस्थापनाच्या वा उद्योगाच्या मालकाला बंधनकारक राहातील. ते केवळ कामगार संघटना वा त्यांच्या परिषदाच रद्द करू शकतील.

६. सर्व महत्त्वाच्या सरकारी व्यवस्थापनातील आणि उद्योगातील मालमत्तेच्या संरक्षणाची आणि शिस्त राखण्याची जबाबदारी कामगार आणि कर्मचाऱ्यांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींवर राहील आणि ते शासनाला उत्तरदायी असतील. कर्तव्यपालनात कसूर करणे, साठे आणि हिशेब दडवून ठेवणे इत्यादी गुन्हे करणाऱ्या व्यक्तींना कडक शासन केले जाईल. त्यासाठी त्यांची संपूर्ण मालमत्ता जप्त करणे आणि पाच वर्षांपर्यंतची कैद अशा शिक्षा केल्या जातील.

७. शासनाच्या दृष्टीने महत्त्वाचे उद्योग याचा अर्थ संरक्षण आणि जनतेच्या गरजा भागवणाऱ्या अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन करणारे उद्योग.

८. कामगार प्रतिनिधींच्या स्थानिक समित्या (सोव्हिएट्स) कामगारांच्या नियंत्रणाविषयी तपशीलवार नियम बनवू शकतात. तसेच कारखाना समित्यांच्या परिषदा अथवा कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधींच्या सर्वसाधारण सभाही असे नियम बनवू शकतात. **(सर्व अनुवाद : डॉ. उदय नारकर)**

# आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचाचे दुसरे राज्य अधिवेशन

## अलंगुन, ता.सुरगाणा, जि.नाशिक - दि. २६-२७ एप्रिल २०१७

आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचाचे दुसरे राज्य अधिवेशन दि. २६-२७ एप्रिल रोजी अलंगुन, ता. सुरगाणा, जि. नाशिक येथे भरेल. या अधिवेशनास मार्गदर्शन करण्यासाठी वृंदा करात आणि खासदार जितेंद्र चौधरी हजर राहतील. प्रतिनिधी फी रु. २००/- असेल.

विविध जिल्ह्यांना दिलेले प्रतिनिधी कोटे पुढीलप्रमाणे आहेत. नाशिक व ठाणे-पालघर - प्रत्येकी ५०, नंदुरबार, अहमदनगर, पुणे, यवतमाळ व नांदेड - प्रत्येकी १०, बुलडाणा, अमरावती, परभणी, हिंगोली, गोंदिया - प्रत्येकी ५.

**आमदार जे. पी. गावीत (अध्यक्ष)** **बारक्या मांगात, जयसिंग माळी (संयुक्त निमंत्रक)**

# समाजवादी नेते लेनिन मोरेनो यांची इक्वॅडोरच्या राष्ट्राध्यक्षपदी निवड !



लॅटिन अमेरिकेतील इक्वॅडोर या देशाच्या राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणुकीच्या दुसऱ्या फेरीतील मतदानानंतर ५१.१६ टक्के मते मिळवून लेनिन मोरेनो यांची देशाच्या राष्ट्राध्यक्षपदी निवड झाल्याचे जाहीर झाले. मोविमिइंतो एलिएन्झा पाइस या सत्ताधारी पक्षातर्फे राष्ट्राध्यक्ष लेनिन मोरेनो व उपराष्ट्राध्यक्षपदासाठी जॉर्ज ग्लास यांनी निवडणूक लढवली व जिंकली.

राष्ट्रीय निवडणूक आयोगाच्या अहवालानुसार ९९.६५ टक्के मताने म्हणजे जवळपास संपूर्ण मतमोजणी झाल्यावर सत्ताधारी पक्षाचे उमेदवार मोरेनो व ग्लास यांना ५५ लाख ७० हजारांहून अधिक मते मिळाली, तर विरोधी पक्षाचे उमेदवार गुईलेर्मो लासो आणि आंद्रेस पापुज हे ४८ लाख (जवळपास ४९ टक्के) मते मिळवून दुसऱ्या स्थानावर आहेत.

निकाल जाहीर करताना निवडणूक आयोगाचे अध्यक्ष जुआन पाब्लो पोजो यांनी सांगितले की, इक्वॅडोरच्या एकूण १,२८,१६,६९८ मतदारांपैकी ८२.८९ टक्के मतदारांनी निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क बजावला.

मतदान शांततापूर्ण व नि:पक्षपाती वातावरणात पार पडले. देशभरातील सर्व मतदान केंद्रातील मतदारांना, तसेच देशाबाहेर असलेल्या नागरिकांना निर्वेधपणे मतदान करता यावे, याकरता मतदान प्रक्रियेदरम्यान तसेच मतपत्रिकांची छाननी, मोजणी, जाहीर सुनावणी ही सर्व प्रक्रिया दोन्ही प्रमुख राजकीय पक्षांच्या उपस्थितीत पार पाडण्यात आली, असेही पोजो यांनी स्पष्ट केले.

देशातील सर्वातील मोठे शहर ग्वाटोकिल तसेच राजधानी क्विटो वगळता २४ पैकी ११ राज्ये व सर्व गजबजलेल्या प्रभागांत मोरेनो यांनी प्रचंड मताधिक्य मिळवत विजय प्राप्त केला.

अध्यक्षपदी निवड होताच मोरेनो यांनी राजधानी क्विटो येथे पत्रकार परिषद घेऊन सर्व समर्थकांचे आभार मानले. संपूर्ण देशाकरता काम करण्यास आपण कटिबद्ध असल्याचे, विशेषत: देशातील गरीब जनतेच्या हिताकरता काम करणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. देशातील नागरिकांसमोर, विशेषत: युवा पिढीसमोर स्वच्छ राजकारणाचा आदर्श निर्माण करण्याचा आम्ही प्रयत्न करू, असेही ते म्हणाले.

मावळते अध्यक्ष राफेल कोरिया यांनी आपल्या कार्यकाळात सुरू केलेले सामाजिक उपक्रम केवळ सुरूच ठेवणार नसून, ते वाढवण्याचा प्रयत्न नवीन अध्यक्ष करणार आहेत. संयुक्त राष्ट्रसंघात विशेष राजदूत म्हणून आपला ठसा उमटविलेल्या मोरेनो यांनी २००७ ते २०१३ या काळात कोरिया यांच्या नेतृत्वाखाली उपाध्यक्ष म्हणून काम केले आहे.

१९९८ साली लेनिन मोरेनो यांना गोळी लागून ते जखमी झाले व त्यामुळे त्यांना अर्धांगवायूचा झटका आला. तेव्हापासून व्हीलचेअरच्या आधारे जगणाऱ्या मोरेनो यांनी अपंगांकरता तसेच सार्वजनिक शिक्षणाच्या प्रसाराकरता झपाटून केलेले काम सर्वांच्या परिचयाचे आहे.

२४ मेपासून नवीन सरकार सत्तेची सूत्रे हाती घेईल. अध्यक्ष म्हणून मोरेनो तर उपाध्यक्ष म्हणून पूर्वीच्या कोरिया यांच्या मंत्रिमंडळात काम केलेले जॉर्ज ग्लास हे आपला पदभार सांभाळतील.

यापूर्वी सलग १० वर्षे अध्यक्षपदी असलेले राफेल कोरिया यांनी समाजहिताच्या दृष्टीने अनेक क्रांतिकारी उपक्रम राबविले. मोरेनो ते पुढे नेतील, यात शंका नाही. मात्र तेवढ्यापुरताच त्यांचा विजय महत्त्वाचा नाही. केवळ इक्वॅडोरच नव्हे तर संपूर्ण लॅटिन अमेरिकेत गेल्या वीस वर्षांपासून राजकारणाला डावे वळण देण्याचा जो प्रयत्न सुरू आहे, त्या प्रयत्नात इक्वॅडोर राष्ट्र सहभागी असेल. २०१६ साली अर्जेंटिना आणि ब्राझिल येथे जे उजवीकडे बदल झाले त्याची पुनरावृत्ती होणार नाही, हे देखील या विजयामुळे निश्चित झाले आहे.

मोरेनो यांच्या निवडीबद्दल इक्वॅडोरचे परराष्ट्र मंत्री गुइलौमे लाँग यांनीदेखील इक्वॅडोरमध्ये आता विषमता दूर करण्याचा प्रयत्न सुरू राहील, गेल्या दशकात आम्ही सामाजिकदृष्ट्या जी प्रचंड प्रगती केली, तिची घोडदौड पुढील चार वर्षे अशीच सुरू राहील, अशा शब्दांत त्यांनी मोरेनो यांच्या निवडीचे स्वागत केले.

गेली अनेक दशके इक्वॅडोर हे राष्ट्र सामाजिक व आर्थिक अस्थिरतेच्या गर्तेत बुडाले होते. त्यात वेळोवेळी होणाऱ्या नेतृत्वबदलाची भर पडत होती. मात्र गेली दहा वर्षे सलगपणे अध्यक्षपद सांभाळत कोरिया यांनी १० लाखांपेक्षा अधिक जनतेला दारिद्र्याच्या खाईतून बाहेर काढले, देशातील आयकर तिपटीने वाढवला, तसेच देशातील सार्वजनिक आरोग्य व शिक्षणव्यवस्था यांचा विस्तार घडवून आणला.

७ एप्रिलला झालेल्या पहिल्या फेरीतील मतदानात मोरेनो यांना जिंकण्यासाठी ०.७ टक्के मते कमी पडली होती. त्यामुळे दुसऱ्या फेरीचे मतदान सबंध देशाकरता निर्णायक ठरले. वर्षभर उजव्या वळणाच्या राजकारण्यांनी केलेला उपद्व्याप बघता विद्यमान राष्ट्राध्यक्ष कोरिया यांनी या निवडणुकीत मोरेनो यांना खंबीर पाठिंबा दिला. मोरेनो यांची निवड जाहीर होताच त्यांच्या समर्थकांनी राजधानी क्विटो येथील पक्ष कार्यालयाबाहेर एकच जल्लोष केला.

या सबंध निवडणूक प्रक्रियेवर देखरेख करण्याकरता उरुग्वेचे माजी राष्ट्राध्यक्ष जोस पेपे मुजिका यांच्यासह अनेक आंतरराष्ट्रीय निरीक्षक नेमण्यात आले होते. त्यांनीही निवडणूक नि:पक्षपातीपणे पार पडल्याची खात्री दिली. मात्र त्याकडे दुर्लक्ष करता विरोधकांनी मतदानात गोंधळ झाल्याचे वृत्त समाजमाध्यमांद्वारे पसरवले. पराभूत उमेदवार लासो व त्यांच्या समर्थकांनी रडीचा डाव खेळत, हे निकाल स्वीकारण्यास नकार देत, हिंसा भडकवण्याचा प्रयत्न केला.

मात्र जनतेचा स्पष्ट कौल मोरेनो यांच्या बाजूने असल्यामुळे इक्वॅडोर राज्यात नवीन 'लेनिन-पर्व' सुरू होईल, ही अत्यंत उत्साहजनक घटना आहे.

**(अनुवाद : प्राची हातिवलेकर)**

# पश्चिम बंगालः राजकीय परिस्थिती आणि निग्रही जनआंदोलने

**डॉ. सूर्यकांत मिश्रा**



अलीकडच्या काळात पश्चिम बंगालमध्ये झालेल्या जनआंदोलनांचे स्वरूप आणि कामगार, शेतकरी व इतर अनेक जनविभागांचा या आंदोलनांतील सहभाग - या दोन्ही बाबतीत सकारात्मक बदल होत असल्याचे स्पष्टपणे दिसू लागले आहे. सत्ताधारी तृणमूल काँग्रेस आणि त्यांचे लाचार पोलीस खाते यांच्या धमक्यांचे आणि दहशतीचे थैमान सुरू होते तरीदेखील आंदोलनांना जनतेकडून मिळालेला प्रतिसाद व जनतेचा सहभाग वाढत होता.

वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये झालेल्या किसान अधिवेशनांमुळे तसेच या अधिवेशनांच्या पहिल्या सत्रांतील जनतेच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे जनआंदोलनांना गती मिळाली. एवढेच नव्हे तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आणि डावी आघाडी यांनी आयोजिलेल्या संयुक्त कृतीकार्यक्रमांमध्येदेखील जनतेचा सहभाग, दखल घ्यावी इतका वाढला.

पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी तृणमूल पक्षाचे उन्मत्त गुंड शैक्षणिक संस्थांचा परिसर गढूळ करीत असल्याचे व विद्यार्थ्यांना भंडावून सोडत असल्याचे चित्र दिसत असले तरी विद्यार्थी संघटनेच्या निवडणुका लढविण्यासाठी विद्यार्थी आता अधिक प्रेरित झाले आहेत. ज्या ज्या ठिकाणी या निवडणुका रितसरपणे पार पडल्या त्या सर्व ठिकाणी डाव्या विद्यार्थी संघटना बहुतांशी यशस्वी झाल्या आहेत. परंतु या धुमश्चक्रीत अनेक विद्यार्थी कार्यकर्त्यांना हिंसाचाराला तोंड द्यावे लागले. विद्यार्थ्यांना जेरीस आणण्यासाठी त्यांच्यावर खोटे खटले भरण्यात आले. परंतु या दहशतवादी राजकारणाच्या आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या विरोधात सर्वत्र वेगवेगळ्या पद्धतीने रोखठोक निषेध व्यक्त करण्यात आला हे महत्त्वाचे.

## कामगारांच्या हिताचे रक्षण

मोदी सरकारने 'पब्लिक सेक्टर युनिट्स' (PSU)वर सुरू केलेले हल्ले वाढत आहेत. राष्ट्रीय हितसंबंधाचे आणि पब्लिक सेक्टर युनिट्सचे रक्षण करण्याच्या आपल्या जबाबदारीतून मोदी सरकारने आपले अंग काढून घेतले असून या युनिट्सचे समभाग ताबडतोब विकून टाकण्याच्या धोकादायक मार्गाने मोदी सरकारची पावले पडत आहेत. एकूण ७४ केंद्रीय पब्लिक सेक्टर युनिट्सच्या खासगीकरणाची अंतिम यादी केंद्राच्या 'नीती आयोगाने' तयार केली असून या युनिट्सचे पूर्णत: किंवा अंशत: खासगीकरण केल्यानंतर ७२००० कोटी रुपये एवढी जास्तीत जास्त रक्कम कमविण्याचे लक्ष्य, सध्याच्या अंदाजपत्रकात निश्चित करण्यात आले आहे. तसेच २५ कोळसा खाणी लिलावात विकण्याचे केव्हाच निश्चित झाले आहे. या धोरणाचे हानिकारक परिणाम पश्चिम बंगाललासुद्धा सोसावे लागत आहेत. याच्या विरोधात कामगार संघटना आघाडी अनेक प्रकारची आंदोलने छेडीत आहे.

या संदर्भात आसनसोल-दुर्गापूर औद्योगिक पट्ट्यात झालेल्या निषेध चळवळींचा आवर्जून उल्लेख करायला हवा. या अखंड चळवळीत औद्योगिक कामगार आणि श्रमिक जनतेचे इतर विभाग मोठ्या संख्येने सामील झाले होते. या व्यापक चळवळीच्या मुख्य मागण्या होत्या - दुर्गापूरचे पोलादी कारखाने, कोळसा उद्योग, हिंदुस्थान केबल्स, दुर्गापूर केमिकल्स यांचे रक्षण करणे; बंद कारखाने पुन्हा चालू करणे व शेतकऱ्यांच्या, शेतमजूरांच्या मागण्या मान्य करणे. या चळवळीला प्रचंड प्रतिसाद मिळाला. परिणामी राज्यातील शेतकऱ्यांच्या व कामगारांच्या आंदोलनामध्ये नवे चैतन्य निर्माण झाले.

## जमिनीचे लढे

जमिनीच्या प्रश्नांवर झालेल्या चळवळींना व लढ्यांना अलीकडच्या काळात नवे परिमाण मिळाले. २०१३ सालच्या भूमी अधिग्रहण कायद्यात काही त्रुटी होत्या हे जरी खरे असले तरी या कायद्याने शेतीशी संबंधीत जनतेला निश्चितपणे काही अधिकार प्राप्त केले होते. या कायद्यात दुरुस्ती करण्याचे मोदी सरकारचे अनेक प्रयत्न फसल्यानंतर, आता राज्य सरकारांकरवी आडवळणाने हा कायदा प्रभावहीन करण्याचा मोदी सरकारचा इरादा आहे. व तो सफल व्हावा म्हणून शेतकऱ्यांनी जमिनीचे अधिग्रहण केल्याची आणि जमिनीचा बेकायदेशीर वापर केल्याची सबब पुढे करून भाजपची राज्य सरकारे व इतर काही सरकारे शेतकऱ्यांवर हल्ले चढवीत आहेत. त्यांच्या जमिनी बेकायदेशीररित्या बळकावण्याचे प्रयत्न होत आहेत.

पश्चिम बंगालचे तृणमूल सरकारदेखील याच वाटेने जात आहे. जमिनीसंबंधीचे कायदे व इतर तरतुदींकडे साफ दुर्लक्ष करून तृणमूलचा आश्रय लाभलेल्या गुमास्त्यांच्या (एजन्टस्) मदतीने आणि राज्य सरकारच्या पाठिंब्याने २०११ पासून शेतकऱ्यांना त्यांच्याच जमिनीवरून हुसकावून लावले जात आहे. सिंगूरमध्ये शेतकऱ्यांना मिळालेल्या जमिनीच्या बाबतीतसुद्धा हा धोका संभवतो. जमीन लुटारूंचे हितसंबंध जपण्यासाठी जमिनीच्या मालकीविषयीची सूत्रे बदलण्याची सरकारची आटापीट सुरू झाली आहे. प्रत्येक जिल्ह्यात अशी बरीच उदाहरणे आढळतात.

अलीकडेच याच्या विरोधात तीन ठिकाणी झालेल्या जनतेच्या उत्स्फूर्त निषेध निदर्शनाची नोंद घ्यायलाच हवी. वीरभूम जिल्ह्यामध्ये 'बोलपूर' या ठिकाणी डाव्या आघाडीच्या सरकारने उद्योगासाठी मिळविलेली व वाटणी केलेली जमीन 'गृहयोजना' आणि तथाकथित 'विश्वबंगला युनिव्हर्सिटी' यांच्या नावाखाली बळजबरीने हडप करण्याच्या तृणमूल सरकारच्या कारस्थानाला, जिल्हा व स्थानिक पातळीवर विरोध झाला. वर्धमान जिल्ह्यात औसग्राम येथे सत्ताधारी पक्षाच्या आदेशानुसार जेव्हा शाळेच्या जमिनीचा बेकायदेशीर बांधकामासाठी ताबा घेण्यात आला, तेव्हा तेथील स्थानिक

जनतेच्या जमावाने त्यास कडाडून प्रतिकार केला, आदिवासीसुद्धा त्यात सामील होते. सरकारच्या ताटाखालची मांजरं झालेले पोलीस, सत्ताधारी पक्षाच्या आदेशानुसार जनतेचा प्रतिकार मोडून काढताना नि:शस्त्र व असहाय्य जमावावर निर्घृण हल्ले करण्यास जरासुद्धा कचरले नाहीत.

जमीन लुटारूंच्या मदतीने सत्ताधारी पक्षाने जमिनी लुबाडण्यासाठी सर्वाधिक निर्दयी हल्ला चढविला होता - उत्तरेकडील २४ परगणा येथील भांगर विभागातील शेतकऱ्यांवर. सत्ताधाऱ्यांना विरोध करणाऱ्या सर्वांची भांगरमधून हकालपट्टी करून तृणमूल पक्षाने २०११ पासून या ठिकाणी दहशतीचे सत्र चालू ठेवले आहे. शेतकऱ्यांच्या हातावर क्षुल्लक रक्कम ठेवून तृणमूल नेते व जमीन लुटारूंनी शेतकऱ्यांना त्यांच्या १३ एकर जमिनीवर पाणी सोडण्यास भाग पाडले. ही जमीन 'विजेच्या ग्रीड'साठी सरकारकडे सोपवताना मात्र सरकारकडून भक्कम मोबदला लाटला. तृणमूलनेसुद्धा आपला हिस्सा मिळविला. याप्रकरणी शेतकऱ्यांबरोबर किंवा जनतेबरोबर कोणताही संपर्क साधण्याचा प्रयत्न झाला नव्हता. भूमी अधिग्रहण कायद्याच्या तरतुदींकडे पूर्णपणे डोळेझाक करण्यात आली होती. सरकारच्या व तृणमूल पक्षाच्या नजरेखाली जमिनीची ही अशी लूट कित्येक वर्षे चालली.

या लुटमारीच्या व दहशतीच्या विरोधात लोकांनी प्रखर आंदोलने केली. पोलिसांनी व तृणमूल गुंडांनी आंदोलनकर्त्यांना बदडून काढले. पोलिसांच्या गोळीबारात दोन निष्पाप, निरपराध युवक मरण पावले, पैकी एक तर विद्यार्थी होता.

स्थानिक जनतेच्या या विक्रमी लढ्याला माकपचा आणि डाव्या आघाडीच्या जनतेचा संपूर्ण पाठिंबा होता. शेतकरी व भांगरचे सर्वसामान्य नागरिक यांच्यासोबत संपूर्ण राज्य अखेरपर्यंत ऐक्य भावनेने उभे होते. अत्यंत प्रतिकूल व गुदमरून टाकणाऱ्या परिस्थितीत अशी निग्रही आंदोलने आशेचा संदेश घेऊन येतात.

## भ्रष्टाचाराची प्रकरणे

'चिटफंड घोटाळा' प्रकरणात जेव्हा तृणमूल काँग्रेस पक्षाचे लोकसभेतील नेते सुदिप बंदोपाध्याय व दुसरे एक संसद सदस्य तपास पाल यांना अटक झाली तेव्हा, तृणमूल पक्षाचे नेतेगण व मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सुरुवातीला या प्रकरणाचा उघडउघड निषेध केला होता. परंतु नंतर मात्र त्यांनी गुपचूप माघार घेतली. तृणमूल काँग्रेसच्या एका गटाने राज्यातील भाजपच्या कचेरीवर पोलिसांच्यादेखत जेव्हा छापा घातला तेव्हा भाजपने उठवलेला हलकल्लोळ जेमतेम दोन-तीन दिवस टिकला, नंतर थंडावला. 'शारदा-नारदा' घोटाळ्याच्या चौकशीची संथगती व स्वरूप पाहिले तर मोदी सरकार स्वार्थासाठी या चौकशीचा राजकीय फायदा उठवू पाहत असल्याचे व त्या तपासप्रक्रियेवर दबाव आणत असल्याचे स्पष्ट होते. एवढंच नव्हे तर चौकशीच्या लिखितामधून (Script) तृणमूल व भाजप या दोन्ही पक्षांमध्ये हेतूपुरस्सररित्या संगनमत झाल्याचे व साटेलोटे असल्याचे दिसते.

तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांना अटक झाल्यानंतर माकप व डाव्या आघाडीने तात्काळ चालू केलेल्या मोहिमेत - तृणमूल पक्ष व सरकार यांची सविस्तर चौकशी झालीच पाहिजे; तसेच शारदा-नारदा योजनेत ज्यांनी पैसे गमावले त्यांना नुकसानभरपाई मिळालीच पाहिजे या मागण्या उठविण्यात आल्या. तसेच या मोहिमेत भाजप आणि तृणमूल यांच्यातील 'तथाकथित' मैत्रीभावाच्या घातक परिणामांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले. या मोहिमेला सर्वसामान्य जनतेचा प्रचंड प्रतिसाद लाभला.

## धर्मांध घटना

अलीकडच्या काळात भाजप-आरएसएसच्या कुटील कारस्थानांमध्ये झपाट्याने वाढ होत आहे. 'हिंदू जागरण मंच', 'हिंदु संस्कृती मंच' इत्यादी संघटनांच्या माध्यमांद्वारे पश्चिम बंगालमध्ये व सरहद्दीवरील विभागांमध्ये खोटा प्रचार करून, तसेच अनेक कार्यक्रमांचे आयोजन करून भाजप-आरएसएस धर्मांध राजकारण जोमाने पुढे रेटीत आहे; लोकांच्या धार्मिक भावना जाणुनबुजून भडकावित आहे. 'तृणमूल'विषयी ज्यांचा साफ भ्रमनिरास झाला आहे अथवा सभासदांची भरती संघपरिवारात करून घेण्याबाबत संघपरिवार अनुत्साही असल्याचे दिसते. चिटफंड घोटाळ्यात तृणमूलच्या दोन संसद सदस्यांना झालेली अटक आणि 'शारदा-नारदा' घोटाळ्याच्या चौकशीबाबत मोदी सरकार करीत असलेली दिरंगाई याच्या पार्श्वभूमीवर राज्यभर तृणमूल काँग्रेस सरकारच्या भ्रष्टाचारी कारभाराच्या विरोधात प्रखर मोहिमा होत असताना नेमक्या त्याचवेळी ठिकठिकाणी धर्मांध तणाव वाढविला जात आहे, वातावरण पेटविले जात आहे.

आणि म्हणूनच धर्मांध ध्रुवीकरणाच्या विरोधातील लढा विस्तृत करणे, आणि तीव्र करणे, आजच्या घडीला अत्यंत निकडीचे आहे, महत्त्वाचे आहे.

## राज्याची लूट

अन्नसुरक्षा योजना सीमित करून आणि पात्रता असलेल्या ग्राहकांना या योजनेच्या कक्षेबाहेर ठेवून सत्ताधारी पक्षाने राज्याची आर्थिक व्यवस्था खिळखिळी केली आहे. बेरोजगारीने भयानक पातळी गाठली आहे. आजारी उद्योगधंदे आणि शेतकरी, शेतमजूर आणि असंघटित कामगारांवरील वाढते आर्थिक हल्ले - यांच्या परिणामी शहरी व ग्रामीण रोजगारनिर्मिती थंडावली आहे. राज्यावरील कर्जाचा बोजा वाढला असून यावर्षीचे कर्ज ३ लाख ६६ हजार कोटींच्या घरात जाईल असा अंदाज आहे. औद्योगिक व शेतीविषयक पायाभूत सेवासुविधांचा विकास करण्यासाठी, २०११च्या निवडणुकांपूर्वी तृणमूल काँग्रेसने दिलेली आश्वासने या सरकारने पाळलेली नाहीत. उलट आजारी व बंद कारखान्यांचे पुनरुज्जीवन करण्याऐवजी व औद्योगिक जमिनींवर उद्योगधंदे सुरू करण्याऐवजी एकूण ९० सरकारी उद्योगांपैकी ४६ सरकारी उद्योग बंद करण्यात आले आहेत. परिणामी ५० हजारांपेक्षा जास्त कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे. या सरकारी उद्योगांची मोक्याची जागा व मालमत्ता विकून महसूल कमवायचा हे सरकारचे धोरण आहे. 'पब्लिक वेल्फेअर प्रॉजेक्ट'चे बजेट कमी करण्यात आले आहे. केंद्र सरकारच्या नोटाबंदीचा सणसणीत तडाखा असंघटित व लहान उद्योगांतील अनेक कामगारांना 'Self-Helf Group'च्या महिलांना बसला आहे. या समाजघटकांना साहाय्य करण्याची कुठलीही जबाबदारी पत्करण्यास सरकार तयार नाही.

## दहशतीचे राजकारण

शैक्षणिक संस्थांची स्वायत्तता नष्ट करून तृणमूल सरकारच्या व पक्षाच्या गुंडांमार्फत या संस्थांवर तृणमूल पक्षाचे वर्चस्व व नियंत्रण प्रस्थापित केले जात आहे. विधानसभेत संबंधित शिक्षणविधेयक पारित करून वरील कारवाईत आता नियमितपणा आणण्यात आला आहे. याचा अर्थ या काळ्या कायद्यामध्येच एकाधिकारशाही अंतर्भूत करण्यात आली आहे.

२०११ साली सत्तेत आल्यापासून सर्वत्र दहशत पसरविण्यासाठी तृणमूल सरकार फासीवादी पद्धतीचा अवलंब करीत आहे. ही पद्धती, टीका

करण्याच्या, निषेध करण्याच्या, आंदोलन करण्याच्या लोकशाही अधिकारांची गळचेपी करते. खून करणे, दुखापत करणे, नोकरीतून काढून टाकणे, दंड भरण्याची सक्ती करणे, घरोघरी जाऊन धमक्या देणे याव्यतिरिक्त निषेध करणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांना व सामान्य जनतेला खोट्या आरोपांखाली अटक करण्यात आली आहे. अशा पद्धतीने नियोजित दडपशाही चालू आहे.

## महिलांवर निष्ठूर हल्ले

तृणमूल काँग्रेसच्या राजवटीत महिला-अत्याचार व बलात्कारांचा कहर झाला. बलात्कारीत स्त्रियांच्या कुटुंबीयांनी तक्रारी नोंदवू नयेत म्हणून त्यांना धमक्या दिल्या जात आहेत. बहुतांशी प्रकरणांमध्ये गुन्हेगारांची सत्ताधारी पक्षाशी जवळीक असल्याचे आढळून आले आहे. अलीकडे मुलांच्या अनैतिक व्यापारांची अनेक प्रकरणे उघडकीस आली. या केसिसमध्ये सुद्धा केंद्रातील किंवा राज्यातील सत्ताधारी पक्षातील काहीजण गुंतलेले आहेत.

## कायद्याचे उल्लंघन

आपल्या पक्षाच्या व इतर डाव्या पक्षांच्या नेहमीच्या राजकीय कार्यक्रमांमध्ये अडथळे निर्माण केले जात आहेत. अलीकडेच विधानसभेमध्ये आंदोलने करण्याचा जनतेचा लोकशाही अधिकार हिरावून घेणारे काळे विधेयक पारित करून घेण्यात आले.

रिक्त जागांवर रितसरपणे नेमणुका होत नसताना, निष्काळजीपणे 'पार्टटाइम' व हंगामी नेमणुका केल्या जात आहेत. तृणमूलच्या पक्षसभासदांचे हितसंबंध जपण्यासाठी, सर्व नियमांना धाब्यावर बसवून सेवा आयोगांचा (Service Commissions) स्वच्छंदपणे वापर करून घेतला जात आहे. प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या नेमणुकांमध्ये भ्रष्टाचार आणि अनियमितपणा वाढीस लागल्याचे दिसते. नोकरीच्या शोधात असणाऱ्या हजारो-लाखो तरुणतरुणी ह्यांचे शिकार होत आहेत. शिक्षणासाठी होणाऱ्या (TET) परीक्षेत (Teachers Eligibility Test) भ्रष्टाचार व घोटाळे बोकाळत आहेत. शिक्षक उमेदवारांची गुणवत्ताआधारीत यादी जाहीर करण्याऐवजी, नव्या पद्धतीअंतर्गत SMS ने नेमणुका होत आहेत. 'सार्वजनिक सेवा आयोगाच्या' (Public Service Commission) माध्यमातून, प्रशासकीय लायकी आणि नि:पक्षपातीपणा याची खात्री करून घेऊन, नेमणुका करण्याची पद्धत या सरकारच्या राजवटीत दुबळी झाली आहे.

हे सरकार करीत असलेल्या लुटमारीमधून कुठलेही क्षेत्र सुटलेले नाही. राज्याची आर्थिक स्थिती अधिकाधिक कोसळत चालली आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय परिस्थिती हाताळण्यासाठी सरकार व सत्ताधारी पक्ष लोकशाहीला डावलत आहेत, अधिकाधिक हिंसक आणि एकाधिकारवादी होत चालले आहेत. ही असह्य परिस्थिती बदलायलाच हवी. ताबडतोब स्थानिक प्रश्नांवर आणि उपजीविकेच्या मुख्य मागण्यांवर आंदोलने प्रखर करायला हवीत, जेणेकरून पुढील काही महिन्यांमध्ये संपूर्ण राज्यात एक प्रभावी, सशक्त लढा उभा करता येईल. केंद्र व राज्य सरकारांनी संयुक्तपणे जनतेवर क्रूर हल्ले चढविले आहेत. भाजप आणि तृणमूल हे दोन्ही सत्ताधारी पक्ष 'क्रोनी कॅपिटलीझिम'चे व भ्रष्टाचाराचे पुरस्कर्ते आहेत. लोकशाहीवर व धर्मनिरपेक्षतेवर दोन्ही पक्ष हल्ले करीत आहेत. जनतेत फूट पाडण्यासाठी दोन्ही पक्षांनी एकाच वेळी धर्मांध ध्रुवीकरण व जातीय फाटाफुटीचा आपल्या स्वार्थासाठी वापर करून घेतला आहे. भाजप आणि तृणमूल काँग्रेस या दोन्ही पक्षांपैकी कुठल्याही एका पक्षाच्या विरोधातील लढे आपण शिथील केले तर दुसऱ्या पक्षाचा फायदा होईल. आणि म्हणून एकाधिकारशाही आणि धर्मांधता याच्या विरोधात सर्व समाजवाद्यांची एकजूट बांधण्याची गरज, आज कधी नव्हे इतकी वाढली आहे.

**(अनुवाद : शोभा ठेकेदत्त)**

---

## (आयझ्रॅक यांची मुलाखत... पान १ ३ वरून)

***पण अशा परिस्थितीत केरळला आपल्या मोहिमेत अडचणींना तोंड द्यावे लागणार नाही का?***

यापूर्वी आम्हाला केंद्राकडून मदत मिळत असे. आता भाजप सरकार आमची योजना टाळू पाहत आहे. आता किती मदत मिळेल हे आम्ही सांगू शकत नाही. यापूर्वी योजना आयोगाशी चर्चा करून केंद्र निधीची तरतूद करत असे. आता ते केंद्रिय अर्थमंत्र्यांच्या लहरीवर अवलंबून राहील. अनेक योजनांतर्गत आणि योजनेतर खर्चात भेद केला जात नाही. पण आमची पद्धत सुव्यवस्थितपणे चालू होती. योजनांतर्गत घटकांवर लक्ष दिल्याने योजनेतर घटकांकडे दुर्लक्ष होते, ही एकच योग्य अशी तक्रार केली जात असते. परंतु अंदाजपत्रकातील आकडे पाहता योजनेतर खर्च फारसा आक्रसलेला दिसत नाही. विकासाचे प्राधान्यक्रम काय असावेत, याविषयी खालून वर आणि वरून खाली चर्चा करणे आणि संसाधनांचा सामाजिकदृष्ट्या अत्यावश्यक वापर करणे यावर आम्ही भर दिला आहे. आता सर्व अधिकार नीती आयोगाकडे नव्हे तर केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या हातात एकवटलेले आहेत. केरळ आपला यापूर्वीचा मार्ग सोडणार नाही. ते स्वातंत्र्य आम्हाला आहे.

***राष्ट्रीय प्रवाहाच्या विरुद्ध जाण्याने काही अडचणी येणार नाहीत?***

काहीही कारण नाही. आमच्या योजनांना केंद्र सरकारने मदत द्यावी अशी अपेक्षा मुळात आम्ही करत नाही. आमच्या दृष्टीने त्याचा आम्हाला फरक पडत नाही. घटनेने जी काही स्वायत्तता आम्हाला मिळाली आहे तिचा आम्ही पुरेपूर वापर करू.

***याचा अर्थ केरळ संसाधनांची संपूर्ण तरतूद करू शकेल?***

फारशी नाही करू शकणार. पण उपलब्ध संसाधने वापरण्यासाठी आम्ही आमची स्वायत्तता पुरेशा ताकदीने वापरू. त्यासाठी समाजाचा सल्ला, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता यांचा आधार घेऊ. त्यातून चांगले प्रकल्प उभे करू. समजा नियोजन गुंडाळल्याने योजनाच नसेल तर काय होईल? पैशाचा वापर कसा करावा, कोणते प्रकल्प घ्यावेत वा घेऊ नयेत हे अर्थमंत्री म्हणून मी एकटा ठरवीन. पण आम्ही हे कटाक्षाने करणार नाही. आम्ही नियोजन प्रक्रिया चालूच ठेवत आहोत. राज्य नियोजन मंडळ ही आमची मजबूत यंत्रणा आहे, आणि त्याच्या काही सुनिश्चित केलेल्या कामाच्या पद्धती आहेत. दुर्दैवाने काँग्रेसशासित राज्यांनाही याबाबतीत काही उत्साह दिसत नाही. माझ्या माहितीनुसार नियोजनाला चिकटून राहिलेले केरळ हे एकमेव राज्य आहे.

***दुसऱ्या जनमोहिमेला पहिल्या मोहिमेत मिळाला तितका अभूतपूर्व प्रतिसाद मिळताना दिसत नाही. याची कारणे काय?***


याबाबतीत जनतेत जरासा कमी उत्साह आहे, हे खरे आहे. आमची २ ९ ९ ६ ची मोहीम फारच धाडसी होती. त्यामुळे तिने जनतेची कल्पनाशक्ती तात्काळ जागी केली. योजनेतील ३ ५टक्के रक्कम आम्ही विनाअट थेट स्थानिक स्वराज्य संस्थांना देणार आहोत, ही कल्पनाच मोठी आकर्षक आणि आव्हानात्मक होती. आता तो उत्साह दिसला नाही तरी लोकांना हळूहळू त्याची जाणीव होईल. शाळा डिजिटल करण्याच्या मोहिमेला अभूतपूर्व प्रतिसाद आमच्या उपक्रमांच्या यशस्वीतेची साक्ष आहे. हा प्रतिसाद अक्षरश: चकीत करणारा आहे. आरोग्य क्षेत्रातील उपक्रमांविषयीही आम्हाला असाच अनुभव येत आहे. विकेंद्रीत लोकशाही विकासाची प्रक्रिया जनमनाचा ठाव घेऊन गती घेईल, असा आम्हाला विश्वास वाटतो.

**(अनुवाद : डॉ. उदय नारकर)**

## केरळचे अर्थमंत्री थॉमस आयझॅक यांची विशेष मुलाखत

# केरळ : विकेंद्रित लोकशाहीचा अनोखा प्रयोग

ऑगस्ट १९९६ मध्ये केरळच्या तत्कालीन डाव्या लोकशाही आघाडी सरकारने 'जनमोहीम' नावाचा कार्यक्रम सुरू केला होता. 'लोकशाहीचे विकेंद्रीकरण' हा त्याचा प्रधान हेतू होता. विकेंद्रित लोकशाही हे घटनेने स्वीकारलेले महत्त्वाचे मूल्य आहे. त्यामुळे या मोहिमेची उद्दिष्टे, ती कशी विकसित होते, तिची फलनिष्पत्ती काय होते याकडे सर्वांचे बारीक लक्ष लागून राहिले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून लोकशाहीचा विस्तार करू पाहणाऱ्या इतर राज्यांचेही या मोहिमेकडे लक्ष होते.



लोकशाही विकेंद्रीकरणाचे सकारात्मक परिणाम आज केरळमध्ये जेवढे दिसतात तेवढे भारतातल्या इतर कोणत्याही राज्यांत दिसून येत नाहीत. केरळने १९९६ मध्ये नवव्या पंचवार्षिक योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी 'जनमोहीम' राबवायला सुरुवात केली. अर्थात मोहिमेला अनेक अडथळे पार करावे लागले. शिवाय कार्यक्रम राजकीय वादविवादांच्या वादळात सापडला. डाव्या लोकशाही सरकारची सत्ता गेल्यानंतर या मोहिमेतली हवा निघून गेली. गेल्या वीस वर्षांत राज्यातील लोकशाही प्रक्रियेतून 'लोक' मोठ्या प्रमाणावर हद्दपार झाले. लोकशाही विकेंद्रीकरणाचा आत्मा असलेली लोकांनी करायचे सुशासन ही कल्पना जणू त्याज्यच ठरली. तरीदेखील १९९६च्या मूळ मोहिमेतून कित्येक सकारात्मक गोष्टी रुजल्या होत्या. विपरीत परिस्थितीतही त्या टिकून राहिल्या होत्या. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना मोठी आर्थिक तरतूद, प्रभावी अधिकार आणि पुरेसा नोकरवर्ग डाव्या लोकशाही सरकारने पुरवला होता. त्यापैकी २० टक्के संस्था आजही विकेंद्रित लोकशाहीचे निष्ठेने पालन करत आहेत.

मुख्यमंत्री पिनरायी विजयन यांच्या नेतृत्वाखालील डाव्या लोकशाही आघाडीच्या नव्या सरकारने राज्याच्या १३व्या पंचवार्षिक योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी नुकतीच 'जनमोहीम' पुन्हा चालू केली आहे. या पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्ट नवा केरळ निर्माण करणे, हा आहे. त्यासाठी राज्यस्तरावर अनेक मिशन्स सुरू करण्यात आली आहेत. शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, सार्वजनिक स्वच्छता, पाण्याच्या स्रोतांचे संवर्धन आणि शंभर टक्के निवारा या प्रत्येक उद्दिष्टासाठी वेगवेगळे मिशन सुरू केले आहे. मे २०१६मध्ये सत्तारूढ झाल्या झाल्या केरळ पंचवार्षिक योजना सुरूच ठेवील आणि राज्य नियोजन मंडळ बरखास्त करणार नाही, अशी घोषणा पिनरायी विजयन यांच्या सरकारने केली. केंद्र सरकारने पंचवार्षिक योजना आणि योजना आयोग गुंडाळून टाकल्याच्या पार्श्वभूमीवर ही घोषणा खूप महत्त्वाची होती.

या संदर्भात फ्रंटलाईन या इंग्रजी पाक्षिकाने राज्याचे अर्थमंत्री थॉमस आयझॅक यांची मुलाखत घेतली. आयझॅक हे एक नामवंत अर्थशास्त्रज्ञ आणि विद्वान असून त्यांनी स्वत: केरळमधील लोकशाही विकेंद्रीकरणाच्या मोहिमेत महत्त्वाची भागीदारी केली आहे. या मुलाखतीत या मोहिमेच्या फलनिष्पत्तीचा, त्यात आलेल्या अडथळ्यांचा आढावा घेत आयझॅक नव्या मोहिमेची रूपरेषा स्पष्ट करतात. ही मोहीम केवळ केरळच्या नवनिर्मितीसाठीच महत्त्वाची नसून ती भारताच्या लोकशाही संस्कृतीच्या संवर्धनासाठी अत्यंत महत्त्वाची आहे, असा त्यांना विश्वास वाटतो. फ्रंटलाईनमधील डॉ. आयझॅक यांच्या मुलाखतीचे काही मुख्य अंश आम्ही छापत आहोत :

***केरळमधील विकेंद्रीकरणाच्या प्रयोगामुळे केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेरही उत्सुकता निर्माण झाली आहे. डाव्या लोकशाही आघाडीच्या सरकारने १९९६ साली सुरू केलेली जनमोहीम हा केरळच्या इतिहासातील एक मैलाचा दगड ठरला आहे. 'नवकेरळ' निर्माण करण्याच्या उद्देशाने १३वी पंचवार्षिक योजना राबवली जाणार असून त्यासाठी राज्याने पुन्हा एकवार 'जनमोहीम' सुरू केली आहे. या मोहीम वा प्रयोगात नेमके काय वेगळेपण आहे?***

'सर्व अधिकार जनतेच्या हाती' ही १९९६च्या मोहिमेतील घोषणा होती. नववी पंचवार्षिक योजना हा त्या घोषणेचा आधार होता. सत्ता, निधी आणि नोकरवर्ग स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्याविषयी जनतेत जागृती करणे हा त्या घोषणेचा उद्देश होता. त्या पंचवार्षिक योजनेतील उद्दिष्ट प्रत्यक्षात यावीत म्हणून योजनेमागे लोकांचे पाठबळ उभारणे ही त्या कार्यक्रमाची दिशा होती. योजनेची प्रक्रिया काय असते हे सर्व संबंधित घटकांना समजावून सांगण्यासाठी एक अनौपचारिक शिक्षणाची मोहीम हा तिचा प्रत्यक्ष कार्यक्रम होता. आता आम्ही प्रत्यक्ष अंमलबजावणीवर लक्ष केंद्रित करणार आहोत. आधीच्या मोहिमेत विकासकामांच्या अंमलबजावणीत जनतेला फारसे स्थान नव्हते. आता आम्ही ते करणार आहोत. शालेय शिक्षणाची गुणवत्ता सुधारणे, शंभर टक्के निवारा, सार्वजनिक स्वच्छता, सेंद्रिय शेती आणि पाण्याच्या स्रोतांचे संवर्धन यावर आम्ही लक्ष केंद्रित करत आहोत. या विषयांना वाहून घेतलेल्या राज्यस्तरीय 'मिशन्स' आम्ही निर्माण केल्या आहेत. या मिशन्सच्या यंत्रणा स्थानिक स्वराज्य संस्थांना मदत करतील. या मिशन्सचे कार्य दुहेरी स्वरूपाचे आहे : अंमलबजावणीवर बारकाईने लक्ष ठेवणे आणि राज्यस्तरीय विभागांचे कार्यक्रम आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यात जास्तीत जास्त एकात्मता निर्माण करणे. तेव्हा या नव्या टप्प्यावर नवी उद्दिष्टे आणि नवी कमाई यांचे परीक्षण आणि मूल्यमापन होईल. अंतिमत: अधिक गुणवत्तापूर्ण, लोकांना उत्तरदायी प्रशासन (सुशासन) निर्माण करण्याच्या दृष्टीने जनतेत उत्साह पैदा करणे हाच या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे, असे म्हणता येईल.

***या आधीच्या लोकशाही विकेंद्रीकरणाच्या मोहिमेतून लक्षणीय फलनिष्पत्ती झाल्याचे स्पष्ट दिसते. पण त्याचसोबत काही अडथळे, काही कमजोऱ्या आणि त्रुटीही होत्या ...***

भूतकाळातील प्रथांपासून मोठी फारकत घेणे हेच त्या मोहिमेपुढील मोठे उद्दिष्ट होते. कामाच्या काही घिशापिट्या पद्धती खूपच रूढ झाल्या होत्या. त्या बदलण्यासाठी लोकांचे पाठबळ आणि त्यांचा सहभाग आवश्यक होता. सामाजिक उत्साह उधाणल्याशिवाय हे शक्य नव्हते. प्रशासन शैली सरकारी आदेशांनी कदापि बदलत नसते. त्यासाठी आंदोलनातून येणारी सर्जनशीलताच गरजेची असते. त्यामुळे जनमोहिमेत एका धमाक्याची, बिगबँगची गरज होती. आम्ही एकादमात योजनेचा ३५ टक्के निधी पंचायतींच्या हवाली केला. त्यांना कामाची स्वायत्तता दिली. अपूर्व लोकसहभागातून पारदर्शक कारभाराची हमी दिली.

पण या सर्व कमाईला संस्थात्मक स्वरूप येण्याअगोदरच त्या आंदोलनाची अखेर झाली. त्यावेळच्या कमाईचे प्रतिबिंब पडतील असे सरकारी कामातील नियमही आज कुठे अस्तित्वात नाहीत. काही बाबतीत तर पीछेहाटच झालेली

दिसते. योजनाबद्ध पीछेहाट. पण अनेक प्रकारची कमाई आजही टिकून राहिलेली आहे - उदाहरणार्थ, अधिकारांच्या विकेंद्रीकरणाला धक्का लावायची कोणत्याच सरकारला हिंमत होणे अशक्य आहे. कर्नाटकचेच उदाहरण घ्या. तेथील जनता पक्षाच्या सरकारने कित्येक बदल केले होते, पण त्यांचा मागमूसही आज तेथे दिसत नाही. पण केरळबद्दल मात्र असे कुणी म्हणू शकणार नाही.

दुसरे म्हणजे सहभाग, समावेशन, वस्तुनिष्ठता, पारदर्शकता आदींसाठी नियोजनाच्या प्रक्रियेतील अवकाश दोन दशके उलटूनही अजून कायम असल्याचे दिसते. त्यामुळे एखाद्या पंचायतीला खरोखरच काही कार्य करायचे झाल्यास तो अवकाश उपलब्ध आहे. केरळमध्ये कुणालाही अभिमान वाटेल असे अत्युत्कृष्ट काम करणाऱ्या सुमारे २०० पंचायती आजही आहेत. कधीकधी त्याही आपल्या मार्गातून चळतात, हे खरे. नव्या लोक आंदोलनात त्या पंचायतींच्या संख्येत अजून भर पडेल आणि राज्यभरात एक मोठा बदल होण्याइतकी पंचायतींची संख्या निर्माण होईल. अर्थातच, भूतकाळात आढळून आलेल्या त्रुटी दुसऱ्या टप्प्यात दूर करण्याचा निश्चितच प्रयत्न होईल. ग्रामसभेतील अपुरा सहभाग ही एक त्रुटी आहे. केरळमध्ये कुटुंबश्री नावाची महिलाकेंद्री दारिद्र्य निवारण संघटनांची रचना तयार झालेली आहे. ग्रामसभांतील सहभागासाठी कुटुंबश्रीचा योग्य वापर करणे शक्य आहे. भ्रष्टाचारावर चाप बसवण्यासाठी सामाजिक हिशेब तपासणीच्या माध्यमातून जास्त पारदर्शकता आणता येईल. अशा रीतीने 'मिशन'पद्धतीचा वापर करून व्यवस्था पुढे हलण्यासाठी धक्का देता येईल. तिची वाटचाल कशी होते आहे, यावर नजर ठेवता येईल.

## मिशन्सचे कार्य

***या राज्यस्तरीय मिशन्समुळे विकेंद्रीकरणाऐवजी केंद्रीकरण होण्याचाच धोका नाही काय? या मिशन्सचे कार्य नेमके कसे राहणार आहे?***

मिशन्स या विकेंद्रीकरणाला अडथळा ठरतील अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे, हे खरे. पण त्याबाबत पुरेशी खबरदारी घेण्यात आली आहे. मिशन यंत्रणा ही काही स्थानिक संस्थांना समांतर अशी व्यवस्था नाही. राज्यस्तरीय उद्दिष्टे निश्चित करणे, हे मिशन्सचे प्रमुख कार्य आहे. स्थानिक स्तरावर हस्तक्षेपाला उत्तेजन मिळेल अशी योजना बनवणे, हे मिशन्सचे कार्य आहे. शालेय शिक्षणाच्या गुणवत्तेची समस्या घ्या. राज्यस्तरीय हस्तक्षेपातून ती गुणवत्ता सुधारणे शक्य नाही. स्थानिक सहभागातूनच ते शक्य आहे. केरळमध्ये असा सहभाग हे खासगीकरणाला उत्तर आहे. पण या कार्यक्रमाला भरघोस गुंतवणुकीची गरज असते. उदाहरणार्थ केरळमधील सर्व वर्ग डिजिटल बनवणे. त्यासाठी दरवर्षी साधारणत: १००० कोटी रुपये लागतील. हा काही फक्त वर्गात कम्प्यूटर ठेवायचा मुद्दा नाही. त्याचाही एक स्थानीयच नव्हे तर संस्थानिहायदेखील आराखडा असला पाहिजे. या सुविधा कशा वापरायच्या याचे शिक्षकांनी प्रशिक्षण घेण्याची व्यवस्था हवी. वर्गखोल्यांची सुरक्षादेखील त्यावर आधारीत असेल. खरे तर डिजिटल वर्ग हे सर्व शैक्षणिक सुधारणांचे मूलस्थान बनू शकते. प्रत्येक वर्गात कम्प्यूटर हा एक मोठाच बदल ठरू शकतो. जनतेत त्याविषयी अतिशय उत्साह आहे. अशा रीतीने विविधस्तरीय नियोजनात एकात्मता साधण्याचा आमचा प्रयत्न आहे. पहिल्या मोहिमेच्या वेळी सरकारी यंत्रणेपासून पूर्ण फारकत घेतली पाहिजे असा आमचा समज होता. कारण त्यावेळी सरकारी विभागांना अति अधिकार दिले होते आणि त्या धोरणाविरुद्ध आम्ही लढत होतो. त्यामुळे आम्ही स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रकल्प शासन विभागांना पाठवतदेखील नसू. अशा प्रकल्पांची तपासणी करणारा एक स्वयंसेवकांचा गट असायचा. शासन विभागांना कटाक्षाने दूर ठेवायचे काम तो गट करी. कारण विभाग स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारावर अतिक्रमण करण्यात अत्युत्सुक असे. पण ते आता भूतकाळात जमा झाले आहे. वीस वर्षे निघून गेली आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळणारा पैसा त्यांचा स्वत:चा असतो आणि तो कसा वापरायचा याचे त्यांना संपूर्ण स्वातंत्र्य आहे.

***म्हणजे नोकरशाहीची समस्या राहिलीच नाही, असे तुम्हाला म्हणायचे आहे?***

पूर्वीइतकी नाही. शासन विभागांनी वस्तुस्थिती स्वीकारली आहे. या मिशन्समधील स्थानिक स्तरावरील कामाची अंमलबजावणी स्थानिक स्वराज्य संस्थांनीच करायची आहे. त्यामुळे शिक्षण विभागाचे नियोजन स्थानिक नियोजनाशी एकत्रित करावे लागते. आरोग्य व्यवस्थेचेही असेच आहे. लोकांना शक्य तितक्या आरोग्य सुविधा पुरवण्यासाठी ३ ते ४ हजार कोटी रुपये येत्या ५ वर्षात खर्च केले जाणार आहेत. लोकांवर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलकडे जायची पाळी येणार नाही. कल्पना कराल ती सुविधा सर्व सार्वजनिक हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असेल. प्रचंड मोठी गुंतवणूक केली जाणार आहे. याचे लाभ लोकांपर्यंत पोहोचायचे असतील तर रोगराईचे प्रमाण कमी करावे लागेल. रोगराईने येणाऱ्या मृत्यूचे प्रमाण असेच राहिल्यास सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत दिल्या जाणाऱ्या सुविधांचा फारसा उपयोग होणार नाही. तेव्हा राज्यस्तरावरील या गुंतवणुकीसोबतच प्राथमिक आरोग्य केंद्रावरील जनतेचे नियंत्रण वापरून जनतेचे आरोग्य सुधारता येईल. नागरी नियोजनाचे ते काम आहे आणि आरोग्य मिशन त्या कामी मदत करील. या योजनेद्वारे प्रतिबंधात्मक उपाययोजनाही राबवल्या जातील. परंतु, पायाभूत सुविधा आणि आयटीआधारीत आरोग्य सुविधांतील गुंतवणूक आरोग्य मिशनच्या अधिकारात राहील.

त्यामुळे मिशन्स या स्थानिक स्वराज्य संस्थांना गिळून टाकतील ही भीती अनाठायी आहे. जुन्या परिस्थितीला चिकटून राहण्यात काहीच हशील नाही.

## ग्रामसभांतील सहभाग

***लोकांचा ग्रामसभातील सहभाग कमी झाला आहे. त्यांचा उत्साह मावळल्याचे दिसते. बऱ्याच ठिकाणी 'उपस्थिती' कागदावर दाखवली जाते. त्यामुळे संस्थात्मक आणि कायदेशीर काहीही व्यवस्था असली तरी केरळमध्ये निर्णयप्रक्रियेत वा विकेंद्रीकरणात जनतेचा सहभाग झालाच नाही, असे म्हणता येणार नाही का?***

केरळमध्ये सुशिक्षित लोक ग्रामसभांत येत नाहीत, ही खरी समस्या आहे. याचा अर्थ त्यातील चर्चेची गुणवत्ता फारच निकृष्ट असते. यावर मात कशी करायची हा अवघड प्रश्न आहे खरा. याबरोबरच लोकांचा ग्रामसभांतील सहभागही रोडावला आहे. कुटुंबश्री गट विषयपत्रिकेवर आगाऊ विचारविनिमय करून ग्रामसभेत तयारीने येतील अशी आमची अपेक्षा होती. विविध स्तरांवर ग्रामसभापूर्व चर्चा होतील, अशी आमची अपेक्षा होती. असे फारसे झाले नाही हे खरे. उलट गेल्या पाच वर्षांत याबाबतीत अधोगतीच झालेली आहे. आता ते दुरुस्त केले पाहिजे.

***सर्व स्तरातील लोकांनी एकत्र येऊन आपल्या विकासाचा प्राधान्यक्रम ठरवायचा हाच विकेंद्रीकरणाच्या प्रयोगाचा गाभा नाही काय? तो हेतूच साध्य न झाल्याने कोणतेही सरकार या बाबतीत याहून जास्त काही करू शकत नाही असे तुम्हाला वाटत नाही काय? यातून बाहेर पडायचा मार्ग कोणता?***

याची एक वेगळी रीत असू शकते. हे पहा, वेगवेगळ्या लोकांच्या क्षमता वेगवेगळ्या असतात. त्यामुळे सहभागाचे ग्रामसभा हे एकमेव माध्यम असू शकत नाही. इतर गोष्टीही असतात - आणि जननियोजनात याचाच विचार केलेला आहे. त्यात तांत्रिक समित्या आहेत, कामाचे विभागवार गट आहेत, लाभधारकांचे गट आहेत. या मोहिमेत कितीएक संघटना उगवल्या आहेत आणि त्यातील प्रत्येकीत वेगवेगळ्या क्षमतेच्या लोकांना काही ना काही जागा आहे. अर्थात, घटनात्मक चौकटीत ग्रामसभा हाच मूलभूत घटक आहे. पण केवळ घटनात्मक तरतुदींच्या बाहेरही जावे लागते कारण घटनात्मक तरतूद ही केवळ सक्षमता बहाल करणारी व्यवस्था असते. त्यामुळे केवळ ग्रामसभा असून भागत नाही, वेगवेगळ्या प्रकारच्या लोकांच्या सहभागासाठी विविध व्यासपीठेही आवश्यक असतात.

***पहिल्या जनमोहिमेच्या वेळी प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेत लोक सहभागासाठी तज्ज्ञ स्वयंसेवकांची उपस्थिती हा मोठ्या राजकीय***

***वादाचा बनला होता. नव्या जनमोहिमेतदेखील अशा समित्या कार्यरत असणार आहेत का? त्याविषयी वाटणाऱ्या पूर्वीच्या चिंतेची पुनरावृत्ती होण्याची आजही काही शक्यता आहे काय?***

समित्या ही गोष्ट आता भूतकाळात जमा झाली आहे. पण मुळात त्या समित्या होत्याच कशासाठी? त्यावेळी राज्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर सुमारे २०,००० प्रकल्प राबवायचे होते. त्यात लोकसहभाग करायचा तर त्या मोहिमेचे कुणीतरी नेतृत्व करणे आवश्यक होते. ते प्रकल्प सरकारी खात्यांकडे सुपूर्द केले असते तर सगळेच मुसळ केरात गेले असते.

त्या कारणाने आम्ही स्थानिक स्तरावर प्रत्येक प्रकल्प राबवण्यासाठी, त्याचे आर्थिक - तांत्रिक तपशील ठरवण्यासाठी, ते मार्गदर्शक सूत्रात बसतात की नाही हे पाहण्यासाठी आणि प्रकल्पाची जिल्हा नियोजन मंडळाला शिफारस करण्यासाठी स्थानिक तज्ज्ञांची एक समिती असे. जिल्हा नियोजन मंडळांना त्याबाबतचे अंतिम अधिकार असत. ती मूळ कल्पना होती. तज्ज्ञ स्वयंसेवकांना निर्णय घेण्याचे कसलेच अधिकार नव्हते. केवळ शिफारसीचे होते. पण त्या समित्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वरच्या समित्या असल्याचे चित्र रंगवून राजकीय गदारोळ करण्यात आला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या वाढत्या भूमिकेमुळे अस्वस्थ झालेले लोक निव्वळ गोंधळ निर्माण करण्याच्या हेतूने गडबड करू लागले.

तो फारच वाईट अनुभव होता. अक्षरश: हजारो तज्ज्ञ विकेंद्रीकरणाच्या यशासाठी काम करायला पुढे येत होते. पण त्यांना तो हक्क नाकारा असा हट्ट करून त्यांना दूर ढकलण्यात येत होते. आता स्थानिक स्वराज्य संस्था निवडू शकतील अशा विशिष्ट तांत्रिक पात्रता असलेल्या मान्यताप्राप्त तज्ज्ञांची यादी तयार करण्यात आली आहे. पण ते काही प्रकल्पांना तांत्रिक मान्यता देऊ शकणार नाहीत. ते काम सरकारी अभियंते आणि इतर सक्षम अधिकाऱ्यांचे असेल आणि प्रकल्पांची अंतिम जबाबदारी त्यांच्यावरच असेल.

***केवळ ग्रामसभा नव्हे तर तुम्ही स्थानिक स्तरावरील वेगवेगळी क्षमता असलेल्या व्यक्तींना निर्णयप्रक्रियेचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याविषयी बोलत होता. पण अशा परिस्थितीत अंतिम अधिकार कुणाचा असेल? विकेंद्रीकरणात सामान्य जनतेला सक्षम करणे हा आदर्श असल्याने निर्णय कोण घेणार?***

हाच वादाचा मुद्दा आहे. केरळमध्ये ग्रामसभा ही काही अंतिम निर्णय घेणारा घटक नाही. अगदी घटनेतसुद्धा तो अधिकार ग्रामसभेला दिलेला नाही. जनतेला आपली मते मांडण्याचे ग्रामसभा हे एक व्यासपीठ आहे. ही मते नंतरच्या सल्लामसलतीत विचारात घेण्याची व्यवस्था असल्याने लोकांची मते निवडून आलेल्या प्रतिनिधींना सहजासहजी झटकून टाकणे वा त्याकडे दुर्लक्ष करणे दुरापास्त होते. त्यामुळे निवडून आलेल्यांच्या हाती देण्याची प्रक्रिया केरळमध्ये सुरू करण्यात आली आहे. केरळमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक वॉर्डात ग्रामसभा घेतली जाते. अशा प्रसंगी कोणत्या वॉर्डातील ग्रामसभेचा निर्णय त्या स्थानिक स्वराज्य संस्थेवर बंधनकारक राहील? यासाठी ग्रामसभेने केलेल्या शिफारसींवर चर्चा करणारी एक पद्धत आम्ही विकसित केली आहे. कोणते प्रकल्प प्राधान्याने घ्यायचे हे ठरवण्याचा अधिकार निवडून आलेल्या प्रतिनिधींना दिलेला आहे. पण त्याचबरोबर त्याची कारणमीमांसा नियोजन दस्तावेजात देणे त्यांच्यावर बंधनकारक आहे. त्यामुळे कुणालाही मनाला वाटेल तसे निर्णय घेता येत नाहीत. लोक सहभागात मूळ कल्पना ही होती आणि ती तशीच राहील.

***केरळमध्ये अत्युत्कृष्ट काम करणाऱ्या किमान २०० पंचायती आहेत, असे तुम्ही म्हणालात. त्यांच्या यशाचे कारण काय असावे? वारंवार येणाऱ्या पंचायतीच्या पंचवार्षिक निवडणुकांनंतरही त्याच २०० पंचायती चांगले काम करत आहेत काय?***

माझ्या मते केरळमधील प्रत्येक पंचायतीत असा लोकशाही अवकाश आहे. पण हा अवकाश कसा वापरला जाईल हे निवडून आलेले प्रतिनिधी, नागरिकांच्या जिवंत गटांचे अस्तित्व वा प्रकल्प नीट व्हावा यासाठी आग्रह धरणारे, लढणारे स्वयंसेवक आणि संवेदनाशील प्रशासन यंत्रणा यांच्यावर अवलंबून असते. हे सर्व घटक एकत्र यावे लागतात. पण स्थानिक स्वराज्य संस्थांतील निवडून आलेले प्रतिनिधी आमदार - खासदारांच्या पावलावर पाऊल टाकून एकदा निवडून गेले की लोकांशी संपर्क ठेवायची गरज नाही असे मानू शकतात. पण स्थानिक स्तरावर आम्ही एक वेगळ्या प्रकारची व्यवस्था उभी करू पाहत आहोत. याचा अर्थ प्रतिनिधींचा दृष्टिकोन बदलायला हवा, त्यांनी लोकांची आणि तज्ज्ञांची मदत घ्यायला हवी, त्यांना अवकाश देऊन त्यांच्या क्षमता मान्य कराव्यात.

मात्र यात एक समस्या आहे. पाच वर्षे उलटली आणि बळकट परंपरा निर्माण होऊ शकली नाही तर सारे प्रारूपच्या प्रारूप कोसळून पडू शकते. त्यामुळेच अतिशय उत्तम काम केलेल्या पंचायती निवडून आलेले प्रतिनिधी बदलल्याने आपले काम टिकवू शकत नाहीत. हा एक मोठा 'पण' आहे. अशा बाबतीत नागरिकांचे गट स्वयंसेवक हस्तक्षेप करायला आणि संघर्षाला पुढे येतील का, हा दुसरा प्रश्न आहे. काही लोक लगेचच हात बांधून बसतील. त्यात नोकरशाहीचा प्रश्न. तेव्हा विकेंद्रीकरणाच्या यश - अपयशात बरेच पण - परंतु असतात. अर्थात, तुम्ही एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. स्थानिक प्रशासन आणि निवडून आलेले प्रतिनिधी यांच्या कामात सातत्य कसे राखायचे, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. त्याची खात्री देणे कठीण असते.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे या मोहिमेत यशस्वी ठरलेले कित्येक प्रतिनिधी दुसऱ्या वेळी निवडून येऊ शकले नाहीत.

पहिल्या जनमोहिमेच्या वेळी निवडणुकीसाठी फारसे उमेदवार इच्छुक नव्हते. विशेषत: महिला. त्यामुळे त्यांना बळेबळेच निवडणूक लढवायला लावणे आम्हाला भाग पडले. ते चित्र आता बदलले आहे. स्थानिक अधिकाराची, सत्तेची आता लोकांना जाणीव झाली आहे. स्थानिक स्तरावर खूप सत्ता आहे, तसा कामाचा व्यापही दांडगा असावा लागतो. बऱ्याच चांगल्या प्रतिनिधींना पुन्हा संधी मिळत नाही, हेदेखील खरे आहे. महिलांच्या बाबतीत हे जास्त खरे आहे. केरळमध्ये महिलांसाठी राखीव जागा रोटेशन पद्धतीने दिल्या जातात. केरळच्या निवडणुकीत मतदारसंघ दर पाच वर्षांनी बदलतात. पुरुष आपला मतदारसंघ सहज बदलू शकतात. एकदा निवडून आलेल्या महिला मात्र या प्रक्रियेत गळतात.

## दुसरी जनमोहीम

***केंद्र सरकारने पंचवार्षिक योजना पूर्णत: मोडीत काढलेली असताना १३व्या योजनेत केरळने दुसरी जनमोहीम सुरू करायचा निर्णय घेतला आहे.***

केंद्राला नेमके काय करायचे आहे, याची त्याला कल्पना आहे असे मला वाटत नाही. उदाहरणार्थ, 'देशासाठी एक एकात्मिक विकास दृष्टी' विकसित करण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने विकासाचे प्राधान्यक्रम ठरवण्यासाठी विशेष ग्रामसभा भरवाव्यात असे शासनाने जाहीर केले. असा आदेश काढणारे कधी एखाद्या ग्रामसभेत सहभागी झाले नसावेत, अशी मला शंका येते. ग्रामसभेत विशिष्ट गोष्टींवर चर्चा करायची असेल तर खूप पूर्वतयारी करावी लागते. चर्चेची पद्धत ठरवावी लागते. त्याची पूर्वप्रसिद्धी करावी लागते. ते घाईगर्दीने करायचे प्रकरण नाही. तेव्हा अशा सरसकट ग्रामसभा भरवा असा फतवा काढणे हा निव्वळ फार्स आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेला बाजूला सारून ग्रामसभेच्या माध्यमातून विकेंद्रीकरणाचे उद्दिष्ट सफल होणे शक्य नाही. ती विकेंद्रीकरणाच्या तत्त्वाची चेष्टा आहे. योजना आयोग अस्तित्वात असताना तो सुरुवातीला नाखूश असला तरी हळूहळू लोकशाही विकेंद्रिकरणाला अनुकूल होऊ लागला होता. तेवढ्यात भाजप सरकार आले आणि त्यांनी योजना आयोगच बरखास्त केला.

तेव्हा नीती आयोग जे करत आहे त्यात आशेला काही अवसर आहे, असे मला वाटत नाही. ते लोक स्थानिक नियोजनाच्या बाबतीत संवेदनाशील असल्याचे बिलकुल दिसत नाही.

***(पान १० पहा)***

# वर्णद्वेषविरोधी लढ्यातील ज्येष्ठ नेते अहमद कथराडा यांना अखेरचा लाल सलाम!





दक्षिण आफ्रिकेच्या स्वातंत्र्यलढ्यातील ज्येष्ठ नेते अहमद कथराडा यांचे २८ मार्च २०१७ ला प्रदीर्घ आजारानंतर निधन झाले. १९६३-६४ साली गाजलेल्या ऐतिहासिक रिवोनिया खटल्यात आफ्रिकन नॅशनल काँग्रेसचे अध्यक्ष नेल्सन मंडेला आणि सरचिटणीस वॉल्टर सिसुलू यांच्यासमवेत इतर ११ मुख्य आरोपींसमवेत अहमद हेदेखील सहआरोपी होते. कथराडा यांना केपटाउन येथील समुद्रानजिकच्या कुप्रसिद्ध रॉबेन आयलंड तुरुंगात ठेवण्यात आले. तब्बल २६ वर्षे इतर अनेक महत्त्वाच्या नेत्यांसमवेत त्यांनी तेथे तुरुंगवास भोगला. आपले उर्वरित आयुष्य त्यांनी पॅलेस्टाईन मुक्तिसंग्राम आणि त्यांचे इस्त्रायली तुरुंगात शिक्षा भोगत असलेले स्वातंत्र्ययोद्धे यांच्याकरता खर्च केले.

कथराडा यांचा जन्म ट्रान्सवाल राज्यातील श्वायझर-रेनेके या लहानशा गावात सूरत येथून आलेल्या एका मुस्लीम स्थलांतरित कुटुंबात झाला. पुढे शिक्षणाकरता ते जोहान्सबर्ग येथील एका भारतीय शाळेत दाखल झाले. वयाच्या १२व्या वर्षी ते यंग कम्युनिस्ट लीगचे सभासद झाले आणि आफ्रिकेतील वर्णद्वेषी राजवटीविरोधातील असहकार चळवळीत सहभागी झाले. वयाच्या सतराव्या वर्षी त्यांनी शालेय शिक्षण सोडले व आशियाई जनतेच्या जमिनीवर असलेल्या हक्कांवर नियंत्रण आणू पाहणाऱ्या 'घेट्टो कायद्या'विरुद्ध संघर्ष करणाऱ्या ट्रान्सवाल पॅसिव्ह रेझिस्टंस कौन्सिलमध्ये काम करण्यास सुरुवात केली. या लढ्यात त्यांना अटक झाली व दरबान येथील तुरुंगात एक महिन्याच्या कारावासाची शिक्षा झाली. हा त्यांचा पहिला तुरुंगवास.

तुरुंगातून सुटका होताच कथराडा यांनी पुन्हा संघर्षाला जुंपून घेतले. मात्र या असहकार चळवळीने त्यांचा भ्रमनिरास केला आणि ते आफ्रिकन नॅशनल काँग्रेसला येऊन मिळाले. या संघटनेची सैनिकी शाखा 'उमखोन्तो वी सिझ्वे' (राष्ट्राचा भाला) याकरता भूमिगत होऊन ते काम करू लागले. इथियोपिया येथे भरलेल्या आफ्रिकन नेत्यांच्या बैठकीला नेल्सन मंडेला यांना देशाची सीमा गुप्तपणे ओलांडून सहभागी होता आले. या मोहिमेचे नियोजन करून ती यशस्वी करण्यात कथराडा यांचा फार मोलाचा वाटा होता.

अंकल कॅथी या टोपणनावाने ओळखले जाणारे कथराडा यांना उत्तर जोहान्सबर्ग येथील आफ्रिकन नॅशनल काँग्रेसच्या सैनिकी शाखेच्या मुख्यालयात अटक करण्यात आली. त्यांच्यावर सरकार उलथून पाडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला. कार्यालयावर पडलेली धाड तसेच कथराडा यांना झालेली अटक याचा या सशस्त्र सेनेला जबरदस्त फटका बसला. मंडेला यावेळी रॉबेन आयलंड या तुरुंगात आधीच शिक्षा भोगत होते. त्यांना सुनावणीकरता विमानाने आणण्यात आले. मंडेला व वॉल्टर सिसुलू यांच्यासमवेत अहमद कथराडा यांच्या वर्तनाने या सुनावणीदरम्यान वर्णद्वेषी सरकारचा क्रूरपणा चव्हाट्यावर आणण्यात मोलाची भूमिका बजावली.

कथराडा यांना शिक्षा कमी व्हावी म्हणून अपिल करण्यास सांगण्यात आले. मात्र त्यांनी याला स्पष्ट नकार दिला व २५हून अधिक वर्षे त्यांनी तुरुंगवास भोगला. या तुरुंगवासात त्यांनी चार पदव्या मिळवल्या. मात्र तुरुंगाच्या आवारात पुरून ठेवलेले, मंडेला यांनी लिहिलेले त्यांचे आत्मचरित्र पकडल्या गेल्याचे निमित्त झाले व या अभ्यासावर बंदी घालण्यात आली. मग काय! खडी फोडताना सर्व कैदी इतिहास, राजकारण यावर चर्चा करू लागले व रॉबेन आयलंड हेच अनौपचारिक विद्यापीठ बनले.

कथराडा यांची वयाच्या साठाव्या वर्षी ऑक्टोबर १९८९ मध्ये सुटका झाली. १९९२ साली त्यांना एएनसीच्या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना 'स्वतंत्र, लोकशाही, वर्णभेद व लिंगभेदविरोधी दक्षिण आफ्रिकन देशाच्या निर्मितीकरता दिलेल्या नि:स्वार्थ समर्पणाकरता' देण्यात आला.

१९९२ सालापर्यंत ते दक्षिण आफ्रिकन कम्युनिस्ट पक्षाचे सभासद होते. 'कुठल्याही घृणास्पद अन्यायाविषयी कॉम्रेड कथराडा यांना तीव्र घृणा होती.' या शब्दात दक्षिण आफ्रिकन कम्युनिस्ट पक्षाने त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. जोहान्सबर्गच्या वेस्ट पार्क दफनभूमीत कथराडा यांना चिरविश्रांती देण्यात आली. यानंतरच्या अंतिम संस्काराचे नेतृत्व उपराष्ट्रपती सिरिल रामफोसा यांनी केले.

**कॉम्रेड अहमद कथराडा या महान योध्यास 'जीवनमार्ग'चा अखेरचा लाल सलाम!**

★ ★ ★